# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः12.09.2024** **वारःगुरुवार**

---

1. राष्ट्रपतींच्या हस्ते फ्लोरेन्स नायटिंगेल राष्ट्रीय पुरस्कार प्रदान, पुरस्कारार्थींमध्ये चंद्रपूरच्या आशा बावणे यांचा समावेश
2. 70 वर्षांवरील सर्व ज्येष्ठ नागरिकांसाठी आयुष्मान भारत योजना लागू करण्यास केंद्राची मंजुरी; सहा कोटी ज्येष्ठ नागरिकांना लाभ मिळणार
3. गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेअंतर्गत 135 गोशाळांना 17 कोटी 21 लाख रुपये अनुदान वितरित
4. गणेशोत्सवासाठी आलेल्या चाकरमान्यांच्या परतीसाठी आजपासून एसटी च्या अडीचहजार फेऱ्यांचं नियोजन
5. मुंबईतल्या रस्त्यांचा दर्जा आणि गुणवत्ता राखण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आणि आयआयटी-दरम्यान सामंजस्य करार आणि
6. भंडारा-गोंदियाला अतिवृष्टीचा फटका, विदर्भाला आजही इशारा

**<u>नाईटिंगेल</u>**

2024 या वर्षासाठीचे फ्लोरेन्स नाइटिंगेल राष्ट्रीय पुरस्कार काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते देशभरातल्या परिचारिकांना प्रदान करण्यात आले. महाराष्ट्रातील आशा बावणे यांना हा पुरस्कार मिळाला असून गेली 28 वर्ष त्या चंद्रपूरच्या सरकारी इस्पितळात वैद्यकीय सेवा देत आहेत. बावणे यांनी 20 वर्षे आदिवासी क्षेत्रात सेवा केली असून अतिसाराचा प्रकोप, हज यात्रा लसीकरण तसंच कोविड काळात दिलेल्या विशेष सेवेचा गौरव म्हणून हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला आहे. परिचारिकांनी केलेल्या गुणवत्तापूर्ण सेवेला मान्यता देत सन्मानित करण्यासाठी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाद्वारे दरवर्षी फ्लोरेन्स नाइटिंगेल राष्ट्रीय पुरस्कार देण्यात येतात.

**<u>ज्येष्ठ-विमा</u>**

आयुष्मान भारत पीएम जन आरोग्य योजनेंतर्गत उत्पन्नाची अट न ठेवता 70 वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या सर्व ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य संरक्षण देण्यास केंद्रीय मंत्रिमंडळानं काल मान्यता दिली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बैठकीनंतर सांगितलं की, ज्येष्ठ नागरिकांना 5 लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराची सुविधा मिळणार आहे. देशातील 6 कोटी ज्येष्ठ नागरिकांना याचा लाभ होईल. त्यांना नवीन स्वतंत्र कार्ड दिलं जाईल असंही वैष्णव म्हणाले.

**<u>हमीभाव</u>**

शेतकऱ्यांच्या शेतमालाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे ही राज्य आणि केंद्र सरकारची भूमिका असून सोयाबीन आणि कापसाचा हमीभाव वाढवण्यासाठी, तसंच निर्यातीला परवानगी देण्यासाठी केंद्र सरकारनं अनुकुलता दर्शविली आहे. उपमुख्यमंत्री अजीत पवार यांनी काल मंत्रालयात आयोजित शेतकरी प्रतिनिधींच्या बैठकीत ही माहिती दिली. ऊसाची किमान आधारभूत किंमत वाढवून देण्याचा प्रस्ताव असून विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक थांबवण्यासाठी केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी कठोर भूमिका घेतली आहे. त्याचे सकारात्मक परिणाम लवकरच दिसतील असं त्यांनी सांगितलं. राज्यातील शेतकरी आणि शेतमजूरांच्या प्रश्नांसदर्भात पवार यांच्या अध्यक्षतेखाली काल या बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<u>गोधन अनुदान</u>**

गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेअंतर्गत 34 जिल्ह्यातील 324 तालुक्यातील पात्र 135 गोशाळांना 2023-24 वर्षाकरता 17 कोटी 21 लाख रुपये, अनुदान स्वरुपात वितरित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र गोसेवा आयोगामार्फत राबविण्यात येणाऱ्या गोवर्धन गोवंश सेवा केंद्रामधील पशुधनासाठी आवश्यक असलेल्या वैरणीसाठी वैरण उत्पादन कार्यक्रम राबवला जात असून देशी गोवंशाचं जतन आणि संवर्धन करण्यासाठी राज्यशासनानं महत्त्वाचं पाऊल उचललं आहे. या अनुदानातून गोशाळांनी दुग्धोत्पादन, शेती काम, पशुपैदास,

ओझी वाहणं अशा कामांना उपयुक्त नसलेल्या गाय, वळू, बैल आणि वय झालेले गोवंश यांचा सांभाळ करण्याकरीता चारा, पाणी - निवाऱ्याची सोय उपलब्ध करून दिली आहे.

**रस्ते**

गणेश उत्सवाच्या अनुषंगानं होणारी कोंडी पाहता पुणे शहराच्या मध्यवर्ती भागातील काही रस्ते 18 सप्टेंबरपर्यंत संध्याकाळी 5 नंतर वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहेत. नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असं आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी केल आहे.

**एसटीफेऱ्या-रत्नागिरी**

गणेशोत्सवासाठी रत्नागिरी जिल्ह्यात आलेल्या चाकरमान्यांच्या परतीच्या प्रवासाकरिता राज्य परिवहन महामंडळानं आजपासून अडीच हजार बस गाड्यांच्या फेऱ्यांचं नियोजन केलं आहे. आजच्या गौरी-गणपती विसर्जनानंतर परतीच्या प्रवाशांमध्ये वाढ होईल, हे गृहीत धरून 12 ते 20 सप्टेंबर दरम्यान मुंबई, बोरीवली, ठाणे, पुणे आदी ठिकाणी जाणाऱ्या अतिरिक्त बसफेऱ्यांचं नियोजन करण्यात आलं आहे. ऑनलाइन आरक्षण सुरू असून, गट नोंदणीलाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. गुहागर तालुक्यातून सर्वाधिक 208 गाड्यांची गट नोंदणी करण्यात आल्याची माहिती रत्नागिरी विभाग नियंत्रक प्रज्ञेश बोरसे यांनी दिली.

**रस्ता आयआयटी**

मुंबई महानगरातील सिमेंट रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरण कामाचा दर्जा, गुणवत्ता चांगली राहावी यासाठी मुंबईतील भारतीय तंत्रज्ञान संस्था आयआयटी ची गुणवत्ता नियंत्रणासाठी त्रयस्थ संस्था म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे रस्ते विकासाची अंमलबजावणी करताना आवश्यक तो दर्जा, गुणवत्ता राखण्याची जबाबदारी भारतीय तंत्रज्ञान संस्थेकडे असणार आहे. याकरता बृहन्मुंबई महानगरपालिका आणि आयआयटी यांच्यात काल सामंजस्य करार करण्यात आला. बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील सर्व रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्याच्या उद्देशाने पहिल्या टप्प्यात 392 किलोमीटर तर दुसऱ्या टप्प्यात 309 किलोमीटर असे701 किलोमीटर रस्ते कॉंक्रिटीकरणासाठी कार्यादेश जारी करण्यात आले आहेत.

**नळदुर्ग-सोलापूर**

नळदुर्ग तालुका निर्मितीच्या दृष्टीने नवीन अप्पर तहसील कार्यालयाच्या प्रस्तावाला काल राज्य सरकारच्या उच्चस्तरीय सचिव समितीनं मंजुरी दिली. कार्यालयाचं कार्यक्षेत्र आणि पद निर्मितीचा शासन निर्णय लवकरच निर्गमित होणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. नळदुर्ग इथल्या अपर तहसील कार्यालयाला मान्यता मिळणं हे स्वतंत्र तालुका निर्मितीच्या दिशेने महत्त्वाचं पाऊल असल्याचं पाटील यांनी सांगितलं. तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग शहर - अणदूर, जळकोट, नंदगाव आणि शहापूर या महसुली मंडळातील नागरिकांची अनेक दशकांपासूनची स्वतंत्र नळदुर्ग तालुका निर्मितीची मागणी होती.

**आदिवासी-धुळे**

केंद्र आणि राज्य शासनामार्फत आदिवासी बांधवांसाठी विविध योजना राबविण्यात येत असून या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत अधिक गतीने पोहोचल्यास त्यांच्या जीवनात परिवर्तन होण्यास मदत होईल. असं राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाचे अध्यक्ष आंतरसिंह आर्य यांनी म्हटलं आहे. धुळे जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या समस्यांबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते.

**शेतकऱ्यांचा मृत्यू-चंद्रपूर**

शेतामध्ये फवारणी करत असताना विजेच्या तुटलेल्या तारांमधून धक्का बसल्यानं चंद्रपूरच्या ब्रम्हपुरी तालुक्यातील गणेशपुर इथं चार शेतकऱ्यांचा जागीच मृत्यू झाला. तर एक शेतकरी जखमी झाला आहे. ब्रम्हपुरी इथल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात त्याच्यावर उपचार सुरु आहेत. वन्य प्राण्यांपासून शेतपीकं वाचविण्यासाठी विजेची तार लावल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

**नारायणमहाराज निधन**

पुणे जिल्ह्याच्या पुरंदर तालुक्यातील श्रीक्षेत्र नारायणपूर इथले श्रीसदगुरु नारायण महाराज यांचं निधन ही महाराष्ट्राच्या अध्यात्मिक, पुरोगामी, सुधारणावादी चळवळीची मोठी हानी आहे अशी भावना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली. सामुदायिक शेती, सामुदायिक विवाह, सामुदायिक श्रमदान, व्यसनमुक्तीचं त्यांचं कार्य अखंडीतपणे कायम ठेवणं हीच श्रीसदगुरु नारायण महाराजांना खरी आदरांजली ठरेल असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**उरळी-फुरसुंगी**

फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही दोन्ही गावं पुणे महापालिकेतून वगळून त्यांची नगरपरिषद स्थापन करण्याची अंतिम अधिसूचना राज्य सरकारनं काढली आहे. महापालिकेची सध्याची हद्द 516 चौरस किलोमीटर असून, त्यातून दोन्ही गावांची 28 चौरस किलोमीटरची हद्द वगळण्यात आली आहे. त्यामुळं पुणे महापालिकेचं भौगोलिक क्षेत्र आता 488 चौरस किलोमीटरपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही दोन गावं 2017 मध्ये पुणे महापालिकेत समाविष्ट करण्यात आली होती. या दोन्ही गावांची मिळून लोकसंख्या 75 हजार 405 आहे.

**मौसम**

हवामानाबाबत अत्यंत अचूक आणि वेळेवर माहिती देण्यासाठी 'मिशन मौसम'ला केंद्रीय मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. पुढील दोन वर्षांमध्ये यासाठी दोन हजार कोटी रुपयें खर्च अपेक्षितआहे. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाद्वारे राबविण्यात येणाऱ्या मिशन मौसम अंतर्गत भारताच्या हवामान आणि हवामानाशी संबंधित विज्ञान, संशोधन आणि सेवांना चालना दिली जाणार आहे.

**हॉकी**

पुण्यात सुरु असलेल्या चौथ्या हॉकी इंडिया वरिष्ठ पुरुष आंतरविभागीय राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय खाद्य महामंडळ, पंजाब नॅशनल बँक, भारतीय नियंत्रक आणि लेखा परीक्षण, आणि सेवा क्रीडा नियामक मंडळ या संघांनी क गटातून उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला. तर ड गटातील अन्य सामन्यात, केंद्रीय राखीव पोलीस दलानं केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचा चुरशीच्या लढतीत 4-3 असा पराभव केला.

**पूर-भंडारा**

भंडारा गोंदिया जिल्ह्यात काल अति मुसळधार पाऊस झाल्यामुळं नदी, नाले ओसंडून वाहू लागले आणि अनेक गावांचा संपर्क तुटला. वैनगंगा नदीनं धोका पातळी ओलांडली. त्यामुळे गोसीखुर्द धरणाचे 27 दरवाजे दीड मीटरनं तर 6 दरवाजे एक मीटरनं उघडण्यात आले. भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर जिल्ह्यातील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान वैनगंगा नदीवर पुलाच्या बांधकामात वापरण्यात येणारी क्रेन पुराच्या प्रवाहात वाहून गेली. आठ किलोमिटर अंतरावर ती पाण्याबाहेर काढण्यात यश आलं आहे.

**हवामान**

विदर्भात तुरळक ठिकाणी वीजांसह तसंच मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. अन्यत्र हलका ते मध्यम पाऊस पडेल.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.
# नमस्कार